**गुन्हा रजिस्टर क्र.१९८/२०२३**
**भारतीय दंड विधान संहिता कलम ४०६, ४०८, ४०९, ४१७, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४**

## <u>जामीन आदेश</u>

आरोपी विलास जगन्नाथ सागवेकर यांनी दाखल केलेला अर्ज वाचला. आरोपीतर्फे वकील श्री. स्वराज कारेकर व सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रशांत गावंड यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. आरोपीतर्फे वकीलांनी असे कथन केले की, आरोपी हा त्याच्या घरातील एकटाच कमाविता व्यक्ती असुन त्याच्यावर त्याचे आई-वडील, पत्नी व मुले असे अवलंबुन आहेत. आरोपीस सोने परीक्षक म्हणून सदर बँकेने नियुक्त केलेले होते. आरोपीस चुकीने या केसमध्ये गुतवलेले आहे. सदरचा गुन्हा हा कागदोपत्री पुराव्यावर अवलंबुन आहे. आरोपी हा तीन महिन्यापासून जेलमध्ये आहे. सदर केसचा तपास पुर्ण झालेला आहे व दोषारोपपत्र दाखल झालेले आहे. त्यामुळे आरोपीस अटीशर्तीसह जामीनावर खुले करण्यात यावे असा युक्तीवाद केला.

०३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रशांत गावंड व तपासिक अधिकारी यांनी आरोपीच्या जामीन अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. त्यांनी असे कथन केले की, भारतीय दंड विधान संहिता कलम ४६७ व ४७१ या गुन्हयास आजीवन कारावास आहे. सदर आरोपीने इतर सहकारी यांच्या मदतीने खोटे सोने खरे आहे असे भासवून फसवणून करुन डोंबीवली नागरी सहकारी बँक शाखा महाड जि. रायगड यांची फसवणूक करुन कर्ज इतरांना मिळवून दिल्याचे दिसुन येते. आरोपींस जामीनावर सोडल्यास इतर आरोपींना कायमस्वरुपी पळून जाण्यास मदत करण्याची शक्यता आहे. व फिर्यादी व साक्षीदार यांच्यावर दबाव आणण्याची शक्यता आहे. त्यामुळे

आरोपीस जामीनावर खुले करण्याचा अर्ज नामंजूर करण्यात यावा युक्तीवाद केला.

०४. अभिलेख पाहता असे दिसुन येते की, सदर आरोपी हा या गुन्हयामधील प्रमुख आरोपींपैकी एक आहे. सदर आरोपी हा डोंबिवली नागरी सहकारी बँकेत सोने निरीक्षक म्हणुन काम करीत होता. आरोपी हा बँकेचा प्रमाणीत सोने परीक्षक असलयामुळे बँकेत तारण ठेवलेले सोने खरे आहे की खोटे आहे हे तपासुन पाहण्याची महत्वाची जबाबदारी आरोपीची होती. सदर आरोपी व इतर आरोपींविरुध्द त्यांनी बनावट दागिने गहाण ठेवुन बँकेचे रक्कम रुपये ७,३३,९६,७६८/– रुपयांची फसवणुक केल्याचे दिसुन येते. सदर आरोपीने त्याची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली असती तर एवढा मोठा गुन्हा घडलाच नसता. बँकेतील सर्व पैसा हा सर्वसामान्य ठेवीदारांचा कष्टाचा पैसा आहे. ठेवीदारांनी विश्वासाने बँकेत ठेवलेला पैसा आहे. त्यामुळे सदर आरोपीने सोने निरीक्षक म्हणुन त्याचे काम चोखपणे बजावले असते तर एवढया मोठया रकमेचा अपहार टाळता आला असता. केवळ दोषारोप पत्र दाखल झाले आहे म्हणून आरोपीस जामीनावर खुले करता येत नाही. सबब, सदर गुन्हयाचे स्वरुप व सदर आरोपीचा सहभाग पाहता आरोपीस जामीनावर खुले करणे न्यायोचित होणार नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/–

महाड
दिनांक ३१/०१/२०२४

(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड